PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE 2

# सहकार चळवळीचा विश्लेषणात्मक अभ्यास

**डॉ. संभाजी संतोष पाटील**
श्री. शि. वि. प्र. संस्थेचे महाविद्यालय,
शिंदखेडा, जि.धुळे (महाराष्ट्र) भारत

**प्रस्तावना :**

सहकार ही संकल्पना मानवी सहजीवनातुन उदयास आली. ही संकल्पना मानवी इतिहासा-इतकी जुनी आहे. सहकाराच्या माध्यमातुन एकमेकांना मदत करण्यात येते आणि त्यातुन समाजाच्या लोकांचे जीवन समृध्द बनण्यास मदत होत असते सहजीवन हि एक महत्वाची भारतीय संकल्पना असल्यामुळे ‘सहकार’ या संकल्पनेस भारताचा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. सामुहीक प्रयत्न व सामुहिक हित हा ‘सहकार’ या संकल्पनेचा आधार आहे. सहजीवन ही ज्याप्रमाणे स्वाभाविक आणि नैसर्गिक प्रेरणा आहे. त्याचप्रमाणे ‘सहकार’ हि सुध्दा स्वाभाविक प्रेरणा आहे.मनुष्य हा समाजशील प्राणी आहे व सहकार हे समाजाचे मुळतत्व आहे. मानवाचा इतिहास शोधत असतांना हजारो वर्षांच्या पाठीमागे सहकार या तत्वाची बीजे सापडतात. सहकारामुहे मानवी जीवनाची प्रगती होते.समाजातील लोकांचे एकमेकांना सहकार्य लाभल्यामुळे कामाची गती व गुणवत्ता वाढवण्यास मदत होते. सहकारामुळे काम करणे शक्य होउन, एकमेकांचे बळ वाढण्यास मदत होते. एकमेकांचा फायदा होतो. समुह करणे,एकत्र वस्ती निर्माण करणे, समुहामध्ये कामाची वाटणी करून श्रमविभाजन करणे, स्वयंपुर्ण ग्रामव्यवस्था, एका वस्तुच्या बदल्यात दुसरी वस्तु घेण्याचे व्यवहार करणे. या सर्व मानवी व्यवहारातुन सहकाराची भावना दिसुन येते. आदि मानवापासुन ते आधुनिक युगातील विज्ञाननिष्ठ काळापर्यंत मानवाने आपली सामाजिक, आर्थिक,सांस्कृतिक व वैज्ञानिक प्रगती परस्परांच्या सहकारातुन साधली आहे. म्हणजेच सहकाराची संकल्पना मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये अनुसरली जात होती पण तिचे संस्थात्मक स्वरूप व एक संघटन प्रकार म्हणुन अस्तित्व नव्हते. मानवाच्या जीवनप्रणालीचा एक महत्वाचा आधार म्हणुन सहकाराची चळवळ समाजामध्ये रूजली म्हणुन सहकार हे मानवी प्रगतीचे महत्वपुर्ण साधन मानण्यात येते. औद्योगिक क्रांतिमुळे १८ व्या शतकात भांडवलशाही व्यवस्थेचा जन्म व विकास झालेला आढळून येतो. कारखानदारीचा उदय,वस्तुचे मोठया प्रमाणात उत्पादन बाजारपेठांचा विस्तार, बाजारपेठेतील असणारी तीव्र स्पर्धा, नफेखोरी, ग्राहकांचे होणारे शोषण व पिळवणुक, गरीब-श्रीमंत यांच्यातील वाढत जाणारी विषमतेची दरी आणि त्यातुन निर्माण होणारा कलह, संप व टाळेबंदीच्या माध्यमातुन निर्माण होणारा असंतोष या सर्व गोष्टींचा समाजव्यवस्थेवर झालेला दुषपरिणाम याची सर्व अयोग्य बाजु समाजापुढे आली. विज्ञानाच्या माध्यमातुन प्रगत झालेल्या औद्योगिक व भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील शोषण विरूध्दची एक व्यवस्था म्हणुन सहकार याचा आधार घेण्यात आला. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष ज्या पध्दतीने समाजाला जाणवु लागले. त्या प्रमाणात सहकाराचा विकास मोठया प्रमाणात होउ लागलां. जगातील बहुतेक देशांमध्ये सहकाराचा अवलंब करण्यात येऊ लागला. २० व्या शतकात सहकाराचा अधिक विस्तृत प्रमाणात विकास झालेला दिसुन येतो. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात ‘सहकार’ ही सामाजिक अधिष्ठान असलेली अर्थव्यवस्था समजण्यात आली. औद्योगिक क्रांतिमुळे सहकाराचा विकास

होऊन आधुनिक सहकारी चळवळीस चालना मिळाली जागतिक पातळीवर सुध्दा सहकार क्षेत्रास अनन्नसाधारण स्थान प्राप्त झाले आहे.

- **संशोधनाची उद्‌दीष्टे :-**

१. सहकार चळवळीची माहीती जाणुन घेणे

२. सहकार चळवळीचा उदय आणि विकास यांची माहीती अभ्यासणे

३. सहकाराची गरज याची माहीती जाणुन घेणे

४. सहकार चळवळीची उपयुक्तता याचा अभ्यास करणे

- **शोधनिबंधाचा उद्‌देश :-**

स्हकार चळवळीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्‌देश आहे

- **संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोंतांचा उपयोग करण्यात आला असुन त्यात प्रकाशित, अप्रकाशीत, ग्रंथ पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादी पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. संकलीत माहीतीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

- **संशोधनाची गृहितके :-**

१. सहकार धोरणामुळे ग्रामीण भागाचा आर्थिक विकास झाला.

२. सहकारी संस्थामध्ये लोकांचा सहभाग वाढण्यास मदत झाली.

३. सहकारी संस्थामुळे लोकांमध्ये नेतृत्वगुण विकसीत झाला.

४. सहकारी संस्थामध्ये महिलांना देखील प्रतिनिधीत्व मिळाले.

५. सहकारी संस्था हया लोकांच्या विकासाची माध्यमे असल्याची ओळख निर्माण झाली.

- **सहकार चळवळीची ओळख :-**

‘विना सहकार नाही उध्दार व एकमेकास सहाय्य करू अवघे धरू सुपंथ’ ही वाक्य परिचयाची आहेत. सामान्यातल्या सामान्य माणसास सामान्य जीवन जगता यावे. ही सहकाराची भुमीका आहे. एक काठी लवकर तुटते पण असंख्य काठया एकत्र आलया तर ताकद वाढते. या न्यायाने एक व्यक्ती वैद्यक्तीकरित्या दुर्बल असेल त्या व्यक्तीमध्ये अनेक कमतरता असतील, भांडवल नसेल काही कौशल्य नसतील म्हणुन ती व्यक्ती समाजातली दुर्बल घटक असेल पण

जेव्हा समान उद्दिष्टाने प्रेरित होउन अशा अनेक, दुर्बल` व्यक्ती संघटीत होतात व एखादे कार्य करण्यास प्रेरित होतात तेव्हा त्याचे सामर्थ्य अपराजीत असते. एकमेकांच्या गुणांनी,सक्षमतेने,दुर्बतेवर मात केली जाते व सहकार्याच्या भावनेने काम पुर्ण होते. समान उद्दिष्टाने संघटीत झालेल्या या व्यक्तीमध्ये उच्च-नीच,गरीब-श्रीमंत असा कोणताही भेदभाव नसतो. प्रत्येक व्यक्तीस योग्य वागणुक दिली जाते. सहकारी संस्थेत कोणीही मालक नसतो व कोणीही नोकर नसतो सर्व जण संस्थेचे सभासद असतात लोकशाही मार्गाने सर्व निर्णय घेतले जातात व निर्णयाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व सभासद एकमेकांना जबाबदार असतात. सामुहीक जबाबदारीची जाणीव जोपासली जाते. सहकारी संस्था आपल्या कामकाजावर मर्यादित नफा मिळवितात कारण नफयापेक्षा सेवा व सभासदांच्या गरजांची पुर्तता करण्यास प्राधान्य दिले जाते. या भुमीकेमुळेच सर्वसामान्य व्यक्तींनाही सहकारी संस्थांचा आधार विश्वसनीय ठरतो.

- **सहकार चळवळीचे महत्व** :-

सहकारी चळवळ ही फक्त सामाजिकदृष्टया महत्वाची नसुन राजकीय व आर्थिक दृष्टया महत्वाची आहे. सहकाराने देशाच्या ग्रामीण जीवनास एक आकार देण्याचे काम केले आहे. काही क्षेत्रे असे आहेत की, जिथे सहकाराचीच संपुर्ण मक्तेदारी होती. उदा. साखर उद्योग. सहकाराच्या माध्यमातुन समाजाची रचना एका शिस्तबध्द चौकटीत करणे शक्य आहे. त्यामुळे देशाच्या राजकारणात, समाजकारणात व अर्थकारणात सहकार्य भुमिका अतिशय महत्वाची आहे. सहकाराच्या माध्यमातुन ग्रामीण भागात अनेक उपक्रम राबविता येऊ शकतात. त्यामुळे स्थानिक ठिकाणावर रोजगार निर्मिती होते. लोकांच्या परिस्थितीला हातभार लागत असतो. परिणामी ग्रामीण जनतेचा शहराकडे जाणारा ओढा थांबविता येऊ शकतो. सहकाराच्या क्षेत्राद्वारे अनेक व्यवसाय सुरू झालेले आहेत तसेच नव्यानेही सुरू करता येऊ शकतात. त्यातुन रोजगार निर्मिती होऊन सभासदांना लाभांश रूपाने उत्पन्न मिळु शकते तसेच देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोठया प्रमाणात भर पडते. तेव्हा उत्पन्न वाढविण्यासाठी सहकार हे महत्वपुर्ण क्षेत्र ठरू शकते आज आपला देष अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपुर्ण आहे. यामध्ये सहकाराचा वाटा महत्वपुर्ण आहे. कृषी उत्पादनात वाढ घडवुन आणण्यासाठी सहकारी क्षेत्राचा उपयोग करता येवु शकतो. देशातील काही मोठे व्यापारी,उद्योजक वस्तुंची साठेबाजी करून कृत्रीम टंचाई निर्माण करतात. तसेच उत्पादनात स्वतःची मक्तेदारी निर्माण करतात. परंतु हेच कार्य जर सहकारी क्षेत्राच्या माध्यमातुन केले जावु लागलेतर नफेखोरी प्रवृत्ती कमी होवुन मक्तेदारीला पायबंद घलता येउ शकतो आणि त्यामुळे समाजातील आर्थिक शोषण कमी करण्यास मदत होते. कोणतेही राष्ट्र हे विकसीत अर्थव्यवस्थेकेडे वाटचाल करण्याचे काम करित असते. यासाठी एक मजबुत प्रणालीची गरज असते ही गरज सहकारी क्षेत्र भरून काढु शकेल. त्यामुळे राष्ट्राचा विकास साधण्यासाठी सहकाराचे महत्व हे निश्चितच निर्विवाद आहे. सहकाराच्या माध्यमातुन सर्वसामान्य व्यक्तींना देखील व्यवस्थापन प्रक्रीयेत सहभाग घेता येतो. सहकारी संस्थांची कार्यपध्दती लोकशाही तत्वावर आधारित असल्याने काणालाही या प्रक्रीयेत समाविष्ट होता येते व अधिकाराच्या विकेंद्रिकरणास चालना मिळत असते. सहकाराच्या माध्यमातुन व्यक्ती विकास आणि व्यक्ती विकासातुन सामाजिक विकास साधला जातो. सामाजिक मुल्याची जपवणुक सहकारी चळवळीच्या माध्यमातुन होत असते. 'नफा' या नावापेक्षा 'सेवा' या नावाला प्राधान्य देण्यात येऊन एकुणच सामाजिक विकास घडवुन आणण्यासाठी सहकारी क्षेत्र महत्वपुर्ण ठरते. तसेच सहकारामुळे समाजाचे शांततापुर्वक मार्गाने परिवर्तन घडवुन आणता येते.

- **सहकाराची व्याख्या** :-

आधुनिक काळात सहकार ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरली जाते. वेगवेगळया देशात,निरनिराळया कालखंडात सहकाराचा उगम वेगवेगळया हेतुने झाला असुन त्याच्या स्वरूपात काहीसा फरक आहे त्यामुळे सहकाराच्या व्याख्येत विविधता येते.

(१) **कलव्हर्ट** : “सहकार हा संघटनेचा असा प्रकार आहे की, ज्यामध्ये व्यक्ती मानवी भुमीकेतुन स्वेच्छेने एकत्र येतात आणि आपल्या आर्थिक हिसंबंधाच्या उन्नतीसाठी समानतेच्या नावावर संघटना स्थापन करतात. एच.कलव्हर्ट यांच्या व्याख्येत सांगितल्या प्रमाणे सहकारी संस्था ही लोकांनी स्वेच्छेने स्थापन केलेली असते. यात मानवतेच्या भुमिकेतुन लोक एकत्र येतात. या संस्थेची स्थापना समानतेच्या पायावर झालेली असते. सहकार हा एक संघटन प्रकार आहे. त्यात व्यक्तीचे एकत्रीकरण असते. सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी सहकारी संस्था प्रयत्न करित असतात. यांची व्याख्या फारच लोकप्रिय झाली आहे. कारण त्यात स्वेच्छा संघटन,व्यक्तीचे एकत्रीकरण,समानतेची भुमिका या सारख्या सहकाराच्या मुलभुत तंत्वांचा समावेश झालेला आहे. शिवाय ती सोपी व सुटसुटीत आहे. या व्याख्येत आर्थिक हिसंबंध हा शब्द अधिक व्यापक अर्थाने वापरलेला आहे.त्यातुन सहकाराची सामाजिक भुमिका ध्वनीत होत.

(२) **पॉल लॅम्बर्ट** : स्वतःच्या उपयोगासाठी व्यक्तीच्या समुहाने स्थापन केलेली आणि दिग्दर्शित केलेली लोकशाही नियमानुसार चालविलेली आहे आणि सभासदांच्या व एकुण समाजाच्या सेवेसाठी स्थापन केलेल्या व्यवसाय संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.

पॉल लॅम्बर्ट यांनी ‘सहकाराचे सामाजिक तत्वज्ञान’ या ग्रंथामध्ये हि व्याख्या सांगितलेली असुन त्यात सहकाराची वैशिष्टये सांगितलेली आहेत. ती पुढील प्रमाणे. (१) सहकारी संस्था ही एक व्यावसायीक संस्था आहे. (२)सभासद आणि एकुण समाज या दोघांची सेवा करण्याच्या उद्देशाने तिची स्थापना करण्यात आली आहे. (३)स्वतःसाठी उपयोग करून घेणाऱ्या व्यक्तीची हि संघटना असते. (४) उपयोग करून घेणारे हि संज्ञा त्यांनी व्यापक अर्थाने मांडली आहे. अनेक समिक्षकांनी या व्याख्येला मान्यता दिलेली आहे. (५)‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ हा सहकाराचा मुलमंत्र आहे या व्याख्येत सांगितलेला आहे. (६) ती लोकशाही तत्वानुसार चालविली जाते. (७) सभासदांचे संस्थेवर नियंत्रण असते.

(३) श्री वैकुंठलाल मेहता “सहकार हि व्यापक चळवळ असुन यामध्ये समान गरजा असलेल्या व्यक्ती, समान आर्थिक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी स्वेच्छेने संघटित झालेल्या असतात.“

- **सहकाराचे स्वरूप** :-

भारत हे विसकनशील राष्ट्र असुन त्या समोर बेकारी, दारिद्रय, वाढलेली लोकसंख्या या समस्या आहेत. देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. भांडवलाची गुंतवणुक रोजगार उपलब्ध करून देते व परिणामी दारिद्रय कमी होण्यास मदत होते. तेव्हा भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांत लोकांना विकास प्रक्रीयेत सामावुन घेणे आवश्यक ठरते. सहकारमध्ये लोकांचा सहभाग असतो तेव्हा सहकारी चळवळ भारतास गरजेची आहे. समाजातील ‘दुर्बल’ घटक एकत्र येऊन ‘सबल’ सहकारी संस्थेची स्थापना करतात व आपल्या गरजांची पुर्तता करतात. या चळवळीत मध्यस्थ, भांडवलदार, सावकार या व्यक्तींना व प्रवृत्तींना स्थान नसल्याने ‘पिळवणुक’ हा प्रकार सहकारी चळवळीत दिसणार नाही. ‘एकासाठी एक सर्व व सर्वांसाठी एक’ या भुमीकेतुन लोकांचे संघटन होत असल्यामुळे, प्रमाणिकपणा, काटकसर, परिश्रम, त्याग करण्याची प्रवृत्ती या गोष्टी सभासदांमध्ये आपोआपच वाढीस लागतात. तेव्हा सर्व सामान्यांचा आर्थिक विकास घडवुन आणण्यासाठी सहकार हा महत्वाचा मार्ग आहे. समाजाच्या उन्नतीचे माध्यम म्हणुन सहकाराचे सामाजिक स्वरूप लक्षात घेतले जाते. काही विचारवंतांच्या मते,सहकार हि आर्थिक चळवळ नसुन ती एक सामाजिक चळवळ आहे कारण सहकार हे मुळात सामाजिक गरजेतुन उदयास आले आहे म्हणुन समाजाच्या प्रबोधनाने व विकासाचे कार्य सहकारामुळे गतीमान झाले. समाजात परिवर्तनाची प्रक्रीया सहकारामुळे सुरू झाली. सहकारामध्ये धर्म, जात, पंथ

वर्ग, लिंग हे सर्व भेदभाव बाजुला सारून सर्व सभासदांना समपातळीवर वागणुक दिली जाते. सर्वांना एकसारखे समजले जाते. त्यामुळे समाजातील विषमता कमी होण्यास मदत होते.

सहकारी संस्थांचा कारभार लोकशाही तत्वानुसार चालतो सहकारात 'एक व्यक्ती एक मत' या तत्वाचे पालन करण्यात येते. भाग संस्थेपेक्षा भागधारक व्यक्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्वाची मानली जाते. सभासदांनी पुरविलेले भांडवल त्यांची जात, धर्म विचारात न घेता एकच मत देण्याचा अधिकार असतो म्हणजे भागांच्या संख्येपेक्षा भागधारक व्यक्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने अधिक महत्वाची असते. सभासदांचा सर्वसाधारण सभेत एक व्यक्ती एक मत या तत्वानुसार मतदान करून संचालक मंडळाची निवड केली जाते. संचालक मंडळ मतदान पध्दतीने आपल्यातील एकाची संस्थंचे अध्यक्ष म्हणुन आणि एकाची संस्थेचा उपअध्यक्ष म्हणुन निवड करते. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयांना सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागते म्हणजेच सहकारी संस्थेची सर्वोच्च सत्ता सर्वसाधारण सभेच्या हाती असते सहकारी संस्थेचा कारभार हा खऱ्या अर्थाने लोकशाही पध्दतीने चालतो लोकशाही कारभार हा सहकाराचा गाभा आहे. सहकारी चळवळ हि मुळातच वैचारिक बैठक असलेली ,माणसाला जबाबदार बनविणारी चळवळ आहे. यातुन केवळ आर्थिक व्यवहारच केले जात नाही तर सभासदांच्या गुणात्मक विकासाकडे देखील लक्ष दिले जाते. 'सहकारातुन संस्कार' या न्यायाने लोकांमध्ये मानवी जीवनामध्ये रूजविण्याचे कार्य सहकार चळवळ आतापर्यंत करित आली आहे. लोकांमध्ये उद्योजकता वाढीस लावणे, निष्क्रीय हातांना सक्रीय करून समाजाच्या व देशाच्या विकासाच्या प्रक्रीयेत सामावुन घेणे या करिता सहकारात विशेष प्रयत्न केले जातात. सर्वसामान्य व्यक्तीला असामान्य करण्याच्या दृष्टीकोनातुन त्याच्यावर मुल्य संस्कार करण्याचे कार्य सहकारी संस्थेने केले आहे व पुढेही करित राहणार आहे. सहकाराचा चेहरा सुसंस्कृत आहे व तोच चेहरा भारतीय समाजाला देण्याचे प्रयत्न सहकाराव्दारा चालविले जाते.

- **सहकाराची व्याप्ती** :-

भारतातील सर्वच क्षेत्रामध्ये सहकार चळवळीची व्याप्ती झालेली आहे. १९०४ च्या पतसंस्था कायदयाने सुरू झालेल्या या चळवळीने मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना स्पर्श केलेला दिसुन येतो. सहकारामुळे आपल्या देशातील लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. सहकाराने भारतीय नियोजन पध्दतीत देखील सहकाराने महत्वाची भुमिका बजावलेली आहे. महात्मा गांधीना अपेक्षीत असलेल्या समाजरचनेची पार्श्वभुमी देखील येथे सहकारामुळे निर्माण झाली आहे. सहकाराच्या तत्वांची अंमलबजावणी विविध क्षेत्रात करून मानवाने आपला जीवन मार्ग शंभर वर्षात समृध्द केले आहे. सहकाराने व्याप्त केलेली क्षेत्रे पुढीलप्रमाणे :

१. **कृषीक्षेत्र** : कृषी क्षेत्रात सहकाराचा मोठया प्रमाणात विस्तार झालेला दिसुन येतो. सहकाराने भारतात कृषी क्षेत्र जास्त व्यापले आहे. शेतीसाठी पीक-कर्ज,मध्यम व दिर्घ मुदतचे कर्ज, बी-बियाणे, खते, किटकनाशके, शेतमाल वाहतुक, पाणीपुरवठा, आदिंची सुविधा पुरविण्यासाठी अनेक प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. ग्रामीण भागात कृषी विकासासाठी पत-पुरवठयापासुन पीक संरक्षणापर्यंत विविध सेवा सहकारी संस्थेमार्फत उपलब्ध होतात. म्हणुन भारतात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सहकार एक वरदान ठरले आहे.

२. **सहकार शिक्षण** : सहकाराचे प्रशिक्षण व शिक्षण देण्यासाठी राष्ट्र व राज्य पातळीवर प्रशिक्षण केंद्र व संस्था स्थापन करण्यात आली आहेत. केंद सरकारने पुणे येथे वैकुंठ मेहता सहकारी व्यवस्थापन संस्था स्थापन

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE 2

केली आहे. तर महाराष्ट्रात सहकाराचे प्रशिक्षण देणारी दोन महाविद्यालये व तेरा प्रशिक्षण केंद्रे आहेत. सहकार खात्यामार्फत ती चालविली जातात. चित्रपट निर्मिती, पुस्तक प्रकाशन, सहकारी इस्पीतळ, मस्यपालन, कुक्कुटपालन, औद्योगिक वसाहती मजुर संस्था या क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन झालेल्या दिसुन येतात.

सहकाराच्या व्याप्तीबाबत नागरी क्षेत्रे, ग्रामीण क्षेत्रे व बिगर कृषी क्षेत्रे पतसंस्था बिगर पतसंस्था, व्यापारी क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, व्यवसाय व सेवा क्षेत्र अशा प्रकारे सुध्दा विभाजन केले जाते. सहकाराचा विस्तार व्यापक असुन दिवसें-दिवस त्यात वाढ होत आहे. सहकाराविषयी बाळासाहेब भारदे म्हणतात.

“संस्था तोटयात नसावी हा मुद्दा सर्वमान्य आहे. संस्था अर्थक्षम असली पाहीजे. हा आग्रहही मी समजु शकतो. परंतु संस्थेच्या अर्थक्षमतेच्या आग्रहात सहकार सार्थ राहत नाही याचं भान विसरले जाते. ग्रामकुटंब व ग्राममिठण भावना यावर ग्रामीण सहकाराची इमारत उभी राहु शकते. त्या निष्ठा वा त्या भावना गृप सोसाटयांना वा संस्थांना लागु शकत नाही. सहकारी संस्थेच्या अर्थलाभासाठी सहकारी तत्वा निरर्थ ठरविणे. हे अत्यंत अयोग्य आहे.

**सहकाराची वैशिष्टये** :-

(१) **व्यक्तीचे संघटन** :- समाजातील बहुसंख्य लोकांचे उत्पन्न फार अल्प असते. त्यामुळे ते आपल्या जीवनावश्यक गरजांची व्यवस्थीतरित्या करू शकत नाही. तेव्हा कमजोर व्यक्ती आपल्या गरजा पुर्ण करण्यासाठी एकत्र येतात व सहकारी तत्वानुसार संघटीत होवून सहकारी संस्थेची स्थापना करतात. एकत्र येणे हा सहकाराचा स्थायीभाव आहे. तेव्हा अनेक गरजा असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन सहकाराच्या माध्यमातुन आपल्या गरजा पुर्ण करतात. एकटी व्यक्ती संपुर्ण क्षमतेने आपल्या गरजा पुर्ण करण्यास असमर्थ असते. तेव्हा अनेक व्यक्तीचे संघटन करून अमर्यादीत क्षमतेने अपेक्षित उद्देश साध्य करणे शक्य होते.

(२) **सहकार हे लोकशाही संघटन आहे** :- 'सहकारी संस्था' या लोकांनी लोकांच्या कल्याणासाठी चालविलेल्या असतात. यामुळे ते लोकशाही संघटन आहे. सहकारी संस्थांचा कारभार लोकशाही तत्वानुसार चालविल्या जात असल्यानेच हुकूमशाहीस तेथे थारा नसतो. सहकारात भांडवलापेक्षा व्यक्तींना जास्त महत्व दिले जाते. यामुळे कोणत्याही सभासदांचे भांडवल कमी किंवा जास्त असले तरी व्यवस्थापन प्रक्रियेत फक्त 'एकच मत ' देण्याचा अधिकार असते. 'एक व्यक्ती एक मत' हे सहकाराचे महत्वपुर्ण तत्व मानले जाते. त्यामुळे सभासदांनी धारण केलेली भाग संख्या महत्वाची न मानता व्यक्ती ही महत्वाची समजुन प्रत्येकास 'एक मत' देण्याचा अधिकार असतो व त्यामुळेच सहकारी संस्थेचे व्यवस्थापन लोकशाही पध्दतीने निवडुन आलेले असते व लोकशाही पध्दतीनेच संस्थेचा कारभार चालतो.

(३) **समाज परिवर्तनाचे साधन** :- सहकारी चळवळ ही सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे असे म्हटले जाते. सहकाराच्या माध्यमाद्वारे सभासदांमध्ये लोकशाहीची तत्वे रूजविणे, त्यांच्यात बंधुभाव निर्माण करणे. त्यांच्यात काटकसरीची सवय लावणे त्यांना स्वावलंबी बनविणे. त्यांना इतरांना मदत करण्यास प्रवृत्त करणे. सभासदांमध्ये प्रामाणिकपणाची शिकवण वाढीस लावणे, त्यांना नैतीकतेने व्यवहार करण्यास सांगणे. व्यक्तीगत उद्दिष्ट व स्वार्थ यांना महत्व न देता सामुदायित उद्दिष्टांना महत्वाचे स्थान देणे. ज्यामुळे परिणामकारक सामाजिक परिवर्तन घडून येण्यास मदत होते. तेव्हा सहकार हे सामाजिक परिवर्तनो महत्व पुर्ण स्थान आहे.

(४) **सहकार ही एक आर्थिक व सामाजिक चळवळ आहे :-** समाजाचाच आर्थिक विकास होऊन समाज उन्नत व्हावा हा दृष्टीकोन समोर ठेवून सहकारी संस्थेची स्थापना केली जाते. समाजातील लोकांच्या गरजांची पुर्तता व्हावी त्यांच्या राहणीमानात सुधारणा व्हावी. सहकाराच्या माध्यमातुन आर्थिक घडामोडी सहकारी संस्थेच्या माध्यमातुन केल्या जातात. या आर्थिक घडामोडी सभासदांच्या दुर्बलतेवर मात करण्याऱ्या असतात व त्यांचे आर्थिक परिवर्तन घडवुन आणतात. सहकारी संस्था आपल्या प्रगतीबरोबरच सामाजिक जबाबदारी व आर्थिक जबाबदारीचे भान ठेवतात. सहकारी संस्थामुळे सभासद सावकाराच्या पाशातुन व्यक्त होऊ शकते व स्वाभीमानाने आपले जीवन सहकाराच्या माध्यमातुन जगू शकतो.

(५) **कायदेशिर व्यवहार :-** कायद्यानुसार सहकारी संस्थाची स्थापना होते.त्या ठिकाणी बेकायदेशिर व्यवहारास स्थान नसते. फसवणूक करणे, पिळवणूक करणे, नफेखोरी प्रवृत्ती, साठेबाजी, वैयक्तिक स्वार्थ या बाबी सहकाराच्या कायद्यातील चौकटीत न बसणाऱ्या आहेत. सभासद आपल्यातीलच काही व्यक्तींना लोकशाही पध्दतीने निवडुन देऊन त्यांच्या हातात संस्थेचे व्यवहार सोपवितात. तेव्हा अधिकाराचे विकेंद्रीकरण होऊन लाचलुचपत भ्रष्टाचार इत्यादी गोष्टींना आळा बसतो. निवडुन आलेल्या संचालकांना शेवटी सभासदांना जाब द्यावा लागतो. तेव्हा एकूणच सर्व गोष्टी कायदेशिर होत असल्याने बेकायदेशिरपणास स्थान नसते.

(६) **इतर वैशिष्ट्ये :-**

(अ) सहकारात सर्वानाच सामावुन घेतले जाते. कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही.

(ब) सभासद केव्हाही आपले सभासदत्व रद्द करू शकतात.

(क) सहकारामध्ये सर्व लोकांना समानतेची वागणुक देण्यात येते. कोणीही नोकर नसतो किंवा मालक नसतो.

(ड) सहकारात सर्व व्यक्ती स्वेच्छेने एकत्र येतात. त्यांना सक्ती केली जात नाही.

(इ) सहकारी नितीनियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येते ते सर्व सभासदांना बंधनकारक असल्याने सभासदांमध्ये एकमत असते.

(ई) निर्णयांची जबाबदारी ही एकटयाची नसते तर ती सामुदायिक असते.

(उ) सहकारात हुकुमशाहीला व एकाधिकारशाहीला मुळीच स्थान नसते.

(ऊ) स्वेच्छेने व सामुदायिक उद्दिष्टांसाठी एकत्र आलेल्या सर्वांना सहकाराचे सामर्थ्य प्राप्त होते.

(ह) सहकारामध्ये व्यक्तींच्या अंगी असलेल्या गुणांना वाव दिला जातो. तसेच त्यांची वैशिष्टये वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

(य) सभासदांमध्ये शैक्षणिक परिवर्तन घडवून आणले जाते.

**मूल्यमापन :-**

सहकारी चळवळ ही फक्त आर्थिक विकासासाठी नसुन ती सामाजिक आणि उन्नतीचा एक मार्ग आहे. या चळवळीमुळे लोकांमध्ये एकात्मता, बंधुभाव, समानता या मानवी मुल्यांची जोपासना होते. व्यक्तीव्यक्तीमधील जाती व अर्थभेद संपविण्यात सहकारी चळवळीचा फार मोठा वाटा आहे. सहकारी संस्थेमधील सभासदांमध्ये जबाबदारीची जाणिव निर्माण होते व त्यातुन समाजात स्त्रियांना संपन्न बनविण्यास मदत होते. सहकार चळवळीचे अभ्यासक श्री उल्फ यांना लिहीलेले आहे की, 'सहकार आळशी माणसाला उद्योगी बनविल'. उधळपट्टी करणाऱ्यावर अंकूश ठेवील व अशिक्षितांना सुशिक्षीत बनवील. सहकारी संस्था हया ग्रामीण भागात सामाजिक बांधीलकीने सेवा देतात. सहकारामुळेच ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झालेला दिसून येतो.

## संदर्भ ग्रंथ

(१) डॉ.कोपर्डेकर शरदचंद्र : सहकार परिचय
डॉ.जोशी सी.जे. हिमालय पब्लीशिंग हाऊस
डॉ.भालेराव मार्ग, गिरगांव,मुंबई

(२) सराफ मोहन : सहकार निराली प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे

(३) डॉ.तुपे सु.दा. : भारतातील सहकारी संस्थांची कार्यपध्दती कारक प्रकशन, पुणे.

(४) रायखेलकर ए.आर. : सहकार तत्वे आणि व्यवहार
डांगे अशोक मोहन पब्लीशिंग हाऊस, पुणे

(५) संपा. प्राचार्य डॉ. देवरे : विचारमंथन (संशोधन पत्रिका)
पी. डी. श्री.रोहीदास पाटील यांच्या ग्रामीण राजकीय नेतृत्वाचा अभ्यास
प्रा.मनोहर पाटील. अथर्व पब्लीकेशन्स, जळगांव.

(६) प्रा.भोसले के.एम : सहकार
डॉ.दामजी बी.एच फडके प्रकाशन, कोल्हापुर.

(७) चपळगांवकर नरेंद्र : विकास संकल्पना आणि मार्ग
कुळकर्णी महेश प्रकाशक डॉ.दिनेश भोंडे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.